सकाळ

कोल्हापूर, शनिवार, १० फेब्रुवारी, २०२४

# विद्यापीठाचा नेमबाजी संघ 'खेलो इंडिया'साठी पात्र

कोल्हापूर, ता. ९ : अखिल भारतीय विद्यापीठ नेमबाजी स्पर्धेत यश मिळविणारा शिवाजी विद्यापीठाचा संघ अखिल भारतीय 'खेलो इंडिया'साठी पात्र ठरला. गुवाहाटी येथे २१ ते २७ फेब्रुवारीदरम्यान ही स्पर्धा होणार आहे.

कुरुक्षेत्र (हरियाणा) येथे झालेल्या अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेत ज्ञानेश्वरी पाटील हिने १० मीटर एअर रायफल प्रकारात वैयक्तिक कास्यपदक मिळवले. तिने ६५४ पैकी ६३०.३ गुण मिळवले. ती विवेकानंद महाविद्यालयाची विद्यार्थिनी आहे. पिस्तूल मिक्स शूटिंग संघाने कांस्य पदकाची कमाई केली. संघाने ६०० पैकी ५७२ गुण मिळवले. शहाजी छत्रपती महाविद्यालयाच्या फिझा देसाईने ३०० पैकी २८४, तर के. डब्ल्यू. एस. कॉलेजच्या श्रेयस उपाध्येने ३०० पैकी २८८ गुण पटकावले. कॉमर्स कॉलेजचा आदित्य साळुंखे, तर लहू बाळा परित्रकर महाविद्यालयाने सुमेध सासने, प्रतीक जोंग १० मीटर रायफलसाठी पात्र ठरले आहेत. विवेकानंदच्या ज्ञानेश्वरीसह ऐश्वर्या पोवार, गौरी कांबळे याही स्पर्धेसाठी पात्र ठरल्या. त्यांना प्रशिक्षक डॉ. नीलेश पाटील (राधानगरी महाविद्यालय), डॉ. धनंजय पाटील (आजरा महाविद्यालय) यांचे मार्गदर्शन, तर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. पी. टी. गायकवाड यांचे प्रोत्साहन मिळाले.




कोल्हापूर : नेमबाजीत यश मिळविणारे श्रेयश उपाध्ये, ज्ञानेश्वरी पाटील, फिझा देसाई यांच्यासमवेत डॉ. नीलेश पाटील व डॉ. धनंजय पाटील.

10/02/24

10.2.24




कोल्हापूर : अ.भा. आंतरविद्यापीठ नेमबाजी स्पर्धेत यशस्वी कामगिरी करणारे शिवाजी विद्यापीठाचे खेळाडू. सोबत प्रशिक्षक, मार्गदर्शक.

# अ. भा. विद्यापीठ शूटिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघाचे यश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कुरुक्षेत्र हरियाणा येथे झालेल्या ऑल इंडिया युनिव्हर्सिटी स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने भरघोस यश मिळवले. पुरुष व महिला संघ गुवाहाटी (आसाम) येथे होणाऱ्या अखिल भारतीय स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत.

अ.भा. आंतरविद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या ज्ञानेश्वरी पाटील (विवेकानंद कॉलेज) हिने १० मीटर एअर रायफल प्रकारात वैयक्तिक पदकाची कमाई केली. पिस्तल मिक्स शूटिंग संघाने ६०० पैकी ५७२ गुणांसह कांस्यपदक पटकावले. या संघात फिझा देसाई (छत्रपती शहाजी महाविद्यालय) व श्रेयस उपाध्ये (के. डब्लू. एस.कॉलेज सांगली) यांचा समावेश होता.

तसेच आदित्य साळुंखे (डी. आर. के. कॉलेज), सुमेध सासने, प्रतीक जोंग (लहू बाळा परित्रकर महाविद्यालय, पनोरे) यांची १० मीटर रायफल शूटिंग संघात निवड झाली आहे. तसेच ज्ञानेश्वरी पाटील, ऐश्वर्या पोवार, गौरी कांबळे (१० मीटर एअर रायफल महिला संघ - सर्व विवेकानंद कॉलेज) अखिल भारतीय खेलो इंडिया स्पर्धेसाठी संघ पात्र ठरला आहे.

सर्व खेळाडूंना प्रशिक्षक डॉ. निलेश पाटील (राधानगरी महाविद्यालय), डॉ. धनंजय पाटील (आजरा महाविद्यालय), शिवाजी विद्यापीठचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदींचे मार्गदर्शन लाभले.